तरुण भारत संवाद
शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५

## थोडक्यात महत्त्वाचे

# वंदे मातरम् १५० वर्षपूर्ती सोहळा विवेकानंद कॉलेजमध्ये उत्साहात

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेजमध्ये 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त सामुहिक गीत गायनाचा सोहळा झाला. इन्स्टिट्यूटच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे याचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, वंदे मातरम गीत हे देशाची सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकात्मतेची अस्मिता आहे. येत्या पिढ्यांना राष्ट्रप्रेमाचे संस्कार वंदे मातरम करीत राहील. विद्यार्थ्यांच्या गटगायन देशभक्तीपर गीतांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. 'वंदे मातरम् – राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक' यावर निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. शिक्षण समूहाचे संचालक प्राचार्य विरेन भिर्डी म्हणाले, वंदे मातरम हा भारताचा अखंड ठेवा असून, पिढ्यानपिढ्या उदात्त ध्येय भावना बाळगण्यासाठीचा दीपस्तंभ आहे. प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी देशभक्ती, एकता आणि राष्ट्रीय गौरव यांची जाणीव ठेवण्याचा संदेश दिला. मान्यवरांनी कॉरिडॉरमध्ये उभे राहून एकत्रितपणे "वंदे मातरम् चे गायन करून कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. साहिल जमादार आणि समन्वयक प्रा. सुरज गायकवाड यांनी संयोजन केले.

8.11.25